## नियमित दिवाणी मुकदमा क्र.४०३/२०१६ मधील आदेश नि.क्र.३३

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ नुसार वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती न्यायालयीन आयुक्त यांचेमार्फत मोजणीबाबत दाखल केला आहे.

२. सदर अर्जातील कथन असे आहे की, दावा मिळकत वादीच्या मालकी वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीचे पश्चिमेला प्रतिवादीची गट क्र.१३०/२ ही मिळकत आहे. प्रतिवादी याने पश्चिमेकडील बाजूचा बांध फोडून वादीचे दावा मिळकतीत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. सबब प्रतिवादीचे सदर गैरकृत्य रोखणेकामी वादीने दाव्यात सदरचा अर्ज दिलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपली कैफियत देवून वादीचा दावा नाकारला आहे व अतिक्रमण केले नसल्याबाबत कथन केले आहे. सबब वादी, प्रतिवादीतील वाद विवाद व दाव्याचे स्वरुप विचारात घेता दाव्याचा अंतिम निकाल सुलभ होणेकामी दावा मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. सबब उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करावी व वादी, प्रतिवादीची मिळकतीची मोजणी करुन हद्दीखुणा निश्चित करण्याबाबत आदेश करावे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.१ तर्फे नि.क्र.३८ नुसार म्हणणे देण्यात आले व सदर अर्जाला विरोध केलेला आहे. पुढे असे नमूद केले आहे की, जर मोजणी करायचे झाल्यास संपूर्ण मोजणीचा खर्च वादीवर बसविण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच उभयपक्षातर्फे त्यांच्या सुविज्ञ अधिवक्त्यांचे सविस्तर युक्तीवाद ऐकले.

५. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती लगत असून प्रतिवादीची मिळकत दावा मिळकतीचे पश्चिम बाजूला आहे व त्यादरम्यान असलेल्या बांधावरुन उभयपक्षात वाद आहे तर प्रतिवादीतर्फे असे निवेदन करण्यात आले की, सदरचा अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास मोजणीचा खर्च वादीवर बसविण्यात यावा.

६. या प्रकरणात समाविष्ट असलेल्या दावा मिळकती अ ते ड या मिळकतीच्या पश्चिम बाजूला प्रतिवादी यांची गट क्र.१३०/२ ही मिळकत आहे. सदर दोन्ही मिळकती दरम्यान बांध असल्याबाबत वादीचे कथन आहे. एकंदरीत सदर दावा व कैफियतचे अवलोकन केले असता

उभयपक्षात हद्दीखुणावरुन वाद असल्याचे दिसून येते. मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी असे ग्राहय धरले आहे की, ज्यावेळी दोन लगत मिळकतधारकामध्ये मिळकतीचे हद्दीखुणावरुन किंवा बांधावरुन वाद असल्यास त्या वादाचे निराकरण करणेकामी तज्ञामार्फत मिळकती मोजून त्याचे हद्दीखुणा कायम करणे अगत्याचे आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने वादी, प्रतिवादी यांचे मिळकती मोजून हद्दीखुणा निश्चित करण्याबाबत न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती करण्याबाबत निवेदन केले आहे तर प्रतिवादीतर्फे सुध्दा सदरची मोजणी करण्यास हरकत नसल्याचे अंततः निवेदन केले आहे परंतु सदरची मोजणी वादीने खर्चाने व्हावे असे कथन केले आहे. युक्तीवादा दरम्यान वादीचे सुविज्ञ अधिवक्ता श्री बागल यांनी वादीचे खर्चाने वादी, प्रतिवादीचे मिळकतीची मोजणी करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

७. एकंदरीत उभयपक्षातील वादाचे कारण विचारात घेता व सदरचा दावा पूर्ण गुणदोषावर चालणेकामी वादी, प्रतिवादी यांच्या मिळकती उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांचेमार्फत त्यांना या प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्त करुन मोजणी करणे योग्य व संयुक्तीक वाटते. करीता आदेश.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज नि.क्र.३३ मंजूर करण्यात येते.

२. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे बार्डी येथील दाव्यात नमूद असलेल्या मिळकती अनुक्रमे गट नं.१३१/२/अ, १३१/२/ब, १३१/२/क, व १३२ तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांचे मालकीची गट क्र.१३०/२ हया मिळकती वादीचे खर्चाने उभयपक्षासमक्ष त्यांना अग्रीम नोटीस देऊन मोजण्यात यावे व त्या मिळकतीच्या हद्दीखुणा कायम करुन कोणाचे अतिक्रमण असल्यास त्याबाबत स्वयंपूर्ण अहवाल टिपणीसह व नकाशासह सादर करावा.

४. न्यायालयीन आयुक्त यांची फी वादीने भरावी.

५. येणेप्रमाणे न्यायलयीन आयुक्त यांचेबाबत आदेशिका निर्गमित करावे.

दि.५/४/२०१८

(मि. वि. बुराडे)
सह दि.न्या.क.स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Y. V. Sital (Jr. Clerk) |
| Court | : | Jt. Civil Judge Jr.Dn. Pandharpur |
| Date | : | 5-4-2018 |
| Judgment/order signed by: the Presiding Officer on | : | 5-4-2018 |
| Judgment/Order uploaded on | : | 5-4-2018 |